**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २४८ । बुधवार १ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# अंमली पदार्थांविरोधात विशेष मोहिमेत १७२ आरोपींवर गुन्हे

## सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शासनाच्या 'नशामुक्त भारत अभियाना'ला गती देत अहिल्यानगर पोलिसांनी जिल्ह्यातील अंमली पदार्थ तस्करांवर आणि सेवन करणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या तीन दिवसांत विशेष मोहीम राबवून एकूण १७२ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, ५ लाख ९७ हजार ८९० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा (आणि सर्व पोलीस ठाण्यांना विशेष आदेश देण्यात आले होते. या मोहिमेत पोलिसांनी व्यापक शोधमोहीम राबवली. अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या १६६ इसमांवर कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याविरुद्ध १५७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अंमली पदार्थ (गांजा) बाळगणाऱ्या व विक्री करणाऱ्या ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून २२ किलो ५३८ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे.

### एसपींचे नागरिकांना आवाहन

**अंमली पदार्थांच्या विरोधातील ही मोहीम यापुढेही अशीच अविरत सुरू राहणार आहे. नागरिकांना अंमली पदार्थांच्या विक्रीबाबत किंवा सेवनाबाबत काहीही माहिती मिळाल्यास त्यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखा किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्या नागरिकांचे नाव पूर्णपणे गुप्त ठेवण्यात येईल, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी नागरिकांना केले आहे.**

याप्रकरणी नगर शहरातील तोफखाना, तसेच पाथर्डी, बेलवंडी आणि कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये एकूण ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## माहिती अधिकाराच्या प्रश्नावर तातडीने तोडगा काढा

# अण्णांचे आरोग्य जपा, उपोषणाची वेळ येऊ देऊ नका

## पावसाळी अधिवेशनात आमदार काशिनाथ दाते यांची शासनाकडे भावनिक साद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना उपोषणासारखे टोकाचे पाऊल उचलावे लागू नये, यासाठी शासनाने तातडीने पुढाकार घ्यावा, अशी भावना आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभा सभागृहात मांडली.

सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्यावर बोलताना आमदार दाते सर यांनी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या प्रस्तावित उपोषणाचा विषय अत्यंत



संवेदनशीलपणे सभागृहात उपस्थित करत शासनाला तातडीने हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले.

सभागृहात बोलताना आमदार दाते म्हणाले की, ''अध्यक्ष महोदय, औचित्याचा मुद्दा सुरू करण्यापूर्वी मी आपल्या माध्यमातून शासनाकडे एक महत्त्वाची विनंती करू इच्छितो. माझ्या पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात पद्मभूषण अण्णासाहेब हजारे आणि पद्मश्री पोपटराव पवार यांसारखे दोन थोर समाजसेवक आहेत. माहिती अधिकार कायद्यातील सुधारणांच्या संदर्भात अण्णांनी येत्या ५ जुलैपासून उपोषणाचा इशारा दिला आहे. अण्णांचे वय आज ९० वर्षे असून अशा वयात उपोषणाचा शारीरिक त्रास सहन करणे अत्यंत कठीण आहे. त्यामुळे माझ्या पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या वतीने शासनाला विनंती करतो की, अण्णांवर उपोषण करण्याची वेळ येऊ नये, यासाठी तातडीने ■ पान ४ वर

## एकनाथवाडी येथील जांभुळवाडी जिल्हा परिषद शाळेला

# शेतकऱ्याने ठोकले कुलूप

## विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान



(छाया : सतिष जगताप)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार –**नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले असतानाच, पाथर्डी तालुक्यातील मौजे एकनाथवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जांभुळवाडीला एका शेतकऱ्याने कुलूप ठोकल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शाळेच्या जागेचा मोबदला न मिळाल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्याने हे पाऊल उचलून प्रशासनाचा निषेध नोंदवला आहे.

२५ वर्षांपासून मोबदला प्रलंबित जांभुळवाडी येथील ही शाळा इसवी सन २००० मध्ये स्थापन झाली होती. शाळेच्या इमारतीसाठी दिलेल्या जागेचा मोबदला आज २५ वर्षे झाली तरी संबंधित शेतकऱ्याला मिळालेला नाही.

यापूर्वी मोबदल्यासाठी ३ दिवस उपोषण केल्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी गाय गोठा व विहीर मंजूर करतो असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, आजतागायत कोणत्याही योजनेचा मोबदला न मिळाल्याने अखेर नाराज शेतकऱ्याने शाळेला कुलूप लावले.विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात; पालकांमध्ये तीव्र संताप शाळेला कुलूप लागल्यामुळे चिमुरड्या विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे.

या प्रकारामुळे पालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. स्थानिक प्रशासन, गटशिक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन वस्तुस्थितीची चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. शेतकऱ्याच्या मोबदल्याचा प्रश्न आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण या ■ पान ४ वर

# कोपरगाव व पारनेर परिसरात अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

## ३५ लाखांपेक्षा जास्त मुद्देमाल जप्त, ४ जणांवर गुन्हे दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने कोपरगाव शहर आणि पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करून एकूण ३५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ४ आरोपींवर गुन्हे दाखल केले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष पथके तयार केली होती.



दिनांक ३० जून रोजी या पथकांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे कोपरगाव शहर आणि पारनेर परिसरात छापे टाकले.

कोपरगाव शहर परिसरात ४ ब्रास वाळूसह तब्बल २७ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आकाश संजय रोकडे (वय २९), अजय महादेव जाधव ■ पान ४ वर




# शिर्डीत स्मार्ट मीटर हटवावेत यासाठी आमरण उपोषण

## लेखी आश्वासनानंतर छावा क्रांतीवीर सेनेचे उपोषण स्थगित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –** महावितरणच्या वतीने सध्या राज्यभर वीज ग्राहकांना स्मार्ट पोस्टपेड मीटर बसविण्यात येत असून जुने मीटर काढून घेत कोणतेही शुल्क न आकारता नवीन स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम महावितरणच्या वतीने सुरू आहे.

मात्र काही ठिकाणी स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वीज बिले अवाजवी पद्धतीने जास्त प्रमाणात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर याविरोधात छावा क्रांतिवीर सेनेचे जिल्हाप्रमुख अविनाश शिंदे यांनी शिर्डी महावितरण कार्यालयात बेमुदत आमरण उपोषण सुरू करत नवीन स्मार्ट मीटर तत्काळ काढण्यात यावे, जुने मीटर ग्राहकांना पुन्हा बसविण्यात यावे तसेच येत्या तीन दिवसांत ही कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा यानिमित्ताने देण्यात आला होता.

दरम्यान शिर्डी महावितरणचे उपअभियंता यांनी उपोषण स्थळी येत उपोषणकर्ते शिंदे यांची भेट घेतली व त्यांच्या मागण्या ऐकून घेत त्यावर सकारात्मक चर्चा करत ज्या ग्राहकांना अवाजवी बिले आली असतील त्यांनी महावितरण कार्यालयाशी संपर्क करावा जर तांत्रिक बिघाडामुळे खरोखर वापरलेल्या विजेपेक्षा जास्त बिले आली असतील तर त्यांच्या शंकांचे निरसन करत योग्य बिले ■ पान ४ वर

# प्रोफेसर कॉलनी चौक येथील कचरा संकलन केंद्र तातडीने हलविण्याची नगरसेवकांची मागणी

## महापौर ज्योतीताई गाडे यांची प्रत्यक्ष पाहणी; स्वच्छता, औषध फवारणी आणि पर्यायी जागेच्या पाहणीबाबत प्रशासनाला तातडीच्या सूचना



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मनपा प्रभाग क्रमांक ७ मधील प्रोफेसर कॉलनी चौक येथे असलेले महापालिकेचे कचरा संकलन केंद्र तातडीने अन्यत्र हलविण्यात यावे, अशी मागणी प्रभागातील नगरसेवकांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. या मागणीची गंभीर दखल घेत महापौरांनी प्रत्यक्ष कचरा संकलन केंद्राची पाहणी करून प्रशासनाला तातडीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

प्रोफेसर कॉलनी चौक येथील या कचरा संकलन केंद्रावर सावेडी उपनगरातील विविध भागांतील कचरा ■ पान ४ वर

# 'ग्राउंड फ्लोअरवरच जागा द्या; अन्यथा महापालिकेविरोधात अवमान याचिका'

## नेहरू मार्केट भाजी विक्रेता संघटनेचा इशारा; मूळ गाळेधारकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न पुन्हा पेटला । उपमहापौरांच्या उपस्थितीत महापालिकेत महत्त्वपूर्ण बैठक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेहरू मार्केटच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या नव्या व्यापारी संकुलामध्ये मूळ गाळेधारक व ओटेधारकांचे पुनर्वसन ग्राउंड फ्लोअरवरच करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी मंगळवारी (दि. ३० जून) अहिल्यानगर महानगरपालिकेत उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत नेहरू मार्केट भाजी विक्रेता संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयात महापालिकेने दिलेल्या प्रतिज्ञापत्राची



आठवण करून देत, त्यानुसार पुनर्वसनाची लेखी हमी तातडीने द्यावी, अन्यथा न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा दिला.

या बैठकीला प्रकल्प अधिकारी राजेंद्र मेहेत्रे यांच्यासह महापालिकेचे ■ पान ४ वर

# विधानपरिषद उपसभापतीपदी सचिन अहिर यांची निवड

**मुंबई । वृत्तसंस्था –** ठाकरे गटाला धक्का देत आमदार सचिन अहिर यांनी शिंदेंच्या शिवसेनेकडून विधानपरिषद उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यानतंर, आज त्यांची उपसभापतीपदी निवड झाली. सत्ताधारी पक्षाकडून सचिन अहिर यांचा प्रस्ताव तर महाविकास आघाडीकडून ज. मो. अभ्यंकर यांचा प्रस्ताव निवडणुकीसाठी आला. मात्र, सभागृहाची इच्छा आहे सर्वानुमते निवड व्हावी. त्यामुळे आम्ही आमचा प्रस्ताव मागे घेत आहोत, असे शिवसेना आमदार अनिल परब यांनी म्हटले. त्यानंतर, सचिन अहिर यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



ज.मो .अभ्यंकर यांचा प्रस्ताव आम्ही मागे घेत आहोत असे म्हणत राष्ट्रवादीकडून संजय खोडके यांनी सचिन अहिर यांच्या निवडीचा प्रस्ताव मांडला, विक्रम काळे यांनी अनुमोदन दिले. भाजपकडून प्रवीण दरेकर यांनी प्रस्ताव मांडला, त्याला धैर्यशील कदम यांनी अनुमोदन दिलं, शिवसेनेकडून मनीषा कायंदे यांनी प्रस्ताव मांडला त्याला रविंद्र फाटक यांनी अनुमोदन दिलं. त्यानंतर, बहुमताने हा प्रस्ताव मंजूर झाला आणि आमदार सचिन अहिर यांची राज्यसभेच्या उपसभापतीपदी निवड जाहीर करण्यात आली. सचिन अहिर यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्या राजकीय प्रवासाची माहिती देत त्यांच्या व्यक्तिमत्वाचे कौतुक केले.

## दै. आकर्षण निवडक

### स्कायब्रियब्रिज सोसायटीचा ‘जल है तो कल है’ अनोखा उपक्रम



अहिल्यानगर- स्कायब्रिज सोसायटीमध्ये दर महिन्याच्या २८ तारखेला आयोजित करण्यात येणाऱ्या आनंद चालीसा जपाचे यंदाच्या महिन्याचे आयोजन निनाद भळगट व परिवार यांच्या हस्ते करण्यात आले.यंदाच्या आनंद चालीसा जपामध्ये यावर्षी चांगला व समाधानकारक पाऊस पडावा, सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी यासाठीही सामूहिक प्रार्थना करण्यात आली.या निमित्ताने जलसंवर्धनाचा संदेश देत ‘‘जल है तो कल है’’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. सोसायटीमध्ये पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध असतानाही पाण्याचा वापर जाणीवपूर्वक कमी करण्याचा सामूहिक निर्णय सर्व रहिवाशांनी घेतला.या उपक्रमाअंतर्गत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सकाळी ७.३० ते ९.०० आणि सायंकाळी ७.३० ते ९.०० या दोन वेळांपुरताच ठेवण्यात आला. तसेच धुणे, स्वच्छता व इतर दैनंदिन कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचाही शक्य तितका काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.या उपक्रमात स्कायब्रिज सोसायटीतील सर्व रहिवाशांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जलसंवर्धनाची सामूहिक जबाबदारी स्वीकारली. ‘‘पाणी वाचवा, भविष्य वाचवा’’ हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.याप्रसंगी स्कायब्रिज परिवाराने शहरातील सर्व नागरिकांनाही अशाच प्रकारचे जलसंवर्धनाचे उपक्रम राबवून पाण्याचा जपून व जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले. प्रत्येकाने छोटासा संकल्प केला, तर जलसंधारणाच्या दिशेने मोठे पाऊल उचलले जाऊ शकते, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

### देवस्थान ट्रस्टच्या ४६ वर्षापूर्वी दान केलेल्या जमिनीवर निकम महाराज यांचा डोळा?

अहिल्यानगर- निंबळक येथील श्री समर्थ सद्गुरू हरिहर महाराज संस्थान व महादेव मंदिर ट्रस्टच्या मालकीची सुमारे ४६ वर्षांपूर्वी दानपत्राद्वारे ट्रस्टला मिळालेली जमीन मूळ मालकांच्या वारसांना परत मिळवून देण्यासाठी दबाव आणला जात असल्याचा गंभीर आरोप करत ट्रस्टचे तत्कालीन अध्यक्ष गोपीनाथ लक्ष्मण पवार व तत्कालीन सचिव जालिंदर रायभान निकम यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात तुकाराम हनुमंत गेरंगे, घनश्याम कोंडीबा म्हस्के व नवनाथ सूर्यभान घोलप भानुदास रामभाऊ शेळके यांनी सहाय्यक/उप धर्मादाय आयुक्त यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, श्री समर्थ सद्गुरू हरिहर महाराज संस्थान व महादेव मंदिर ट्रस्ट हा सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेअंतर्गत नोंदणीकृत ट्रस्ट असून धार्मिक व सार्वजनिक कल्याणासाठी कार्यरत आहे. तक्रारीनुसार, सन १९८० मध्ये मूळ मालकांनी कायदेशीर दानपत्राद्वारे ( ) गट क्रमांक ५१/२ मधील सुमारे १५ आर जमीन ट्रस्टला दान दिली होती. सदर जमिनीची नोंद ट्रस्टच्या मालमत्ता पत्रकात तसेच महसूल अभिलेखात देवस्थानच्या मालकीची म्हणून करण्यात आलेली आहे. निवेदनात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चा उल्लेख करत, धर्मादाय आयुक्तांच्या पूर्वपरवानगीशिवाय ट्रस्टची स्थावर मालमत्ता विक्री, हस्तांतरण अथवा परत देणे बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. अशा परिस्थितीत मूळ मालकांच्या वारसांना जमीन परत मिळवून देण्यासाठी अर्ज करण्यास प्रवृत्त करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच त्या अर्जावर समर्थन देण्यासाठी व आमची काही एक हरकत नाही असे दाखवण्या साठी पवार व निकम महाराज यांनी सही केली आहे त्यामुळे त्याचा वारस दार यांना छुपा पाठिंबा आहे असे दिसतेतक्रारदारांनी असा दावा केला आहे की, तत्कालीन अध्यक्ष व सचिव हे ट्रस्टच्या हिताचे संरक्षण करण्याऐवजी वैयक्तिक फायद्यासाठी अथवा संगनमताने मूळ वारसांना जमीन परत मिळवून देण्याच्या प्रक्रियेला पाठबळ देत आहेत. त्यामुळे ट्रस्टच्या मालमत्तेला धोका निर्माण झाला असून हे कृत्य ‘विश्वासभंग’ स्वरूपाचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.याप्रकरणी संबंधित अध्यक्ष व सचिव यांची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, तसेच ट्रस्टच्या मालकीची जमीन कोणत्याही परिस्थितीत हस्तांतरित अथवा परत दिली जाऊ नये, असे स्पष्ट आदेश द्यावेत, अशी मागणी तक्रारदारांनी धर्मादाय आयुक्तांकडे केली आहे.

# पारनेर साखर कारखाना विक्री घोटाळ्याच्या तपासावर न्यायालयाची नजर



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** तालुक्यातील देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखान्याच्या विक्री घोटाळ्यातील दाखल असलेल्या गुन्ह्याचा पुढील तपास आता पारनेर न्यायालयाच्या निगराणीत होणार असल्याचे आदेश पारनेर येथील प्रथम वर्ग न्यायाधीश मुबीन शेख यांनी सोमवारी दिले आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, वर्षभरापूर्वी पारनेर न्यायालयाने देवीभोयरे येथील सहकारी साखर कारखाना विक्रीत घोटाळा केल्याप्रकरणी राज्य सहकारी बँकेचे दोन अधिकारी, क्रांती शुगर कंपनीचे नऊ संचालक, देवीभोयरेचा तत्कालिन तलाठी यांचेवर गुन्हा दाखल करून पुढील तपासाचे आदेश दिले होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर सुमारे दीड वर्षे उलटले तरी गुन्ह्याच्या तपासात कोणतीही प्रगती झाली नाही, यातील आरोपींचे अटकपूर्व जामीन अहमदनगर सत्र न्यायालयाने रद्द केलेले आहेत. तरीहि पोलिसांनी आरोपींना अटक केली नाही. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींनी कारखाना कार्यक्षेत्रावरील सुमारे दिडशे कोटी रुपये किमतीचा गुन्ह्यातील मुद्देमाल गायब केला आहे. तसा पंचनामा पारनेर पोलिसांनी केला आहे.

परंतु तो मुद्देमाल अद्याप हस्तगत केला नाही. सरकारी अधिकाऱ्यांच्या ताब्यातील कारखाना विक्रीचे मूळ दप्तर देखील आरोपींनी फेरबदल करण्याचा प्रयत्न केला होता, फिर्याच्या तक्रारीनंतर मुळ दप्तर पारनेर तहसिलदार यांनी जप्त करून रेकॉर्ड रूमला सुरक्षित ठिकाणी ठेवले आहे. फिर्यादि यांनी पोलिसांना बेचाळीस साक्षीदारांची नावे देऊनहि त्यांचे जबाब अद्याप नोंदवण्यात आलेले नाहीत. राजकीय हस्तक्षेपातून गुन्ह्याचे यापूर्वीचे तपासी अधिकारी पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांची पारनेरहुन मुदतपूर्व बदली करण्यात आली होती.

या सर्व कारणास्तव फिर्यादी असलेल्या कारखाना बचाव समितीने पुन्हा एकदा पारनेर न्यायालयात धाव घेऊन या बाबतची हकीगत न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. पारनेर न्यायालयाने याबाबत गांर्भीयाने दखल घेऊन, या गुन्ह्याचा पुढील तपास न्यायालयाच्या निगराणीत करण्याचे आदेश दिले. न्यायालयाने पारनेर पोलिसांकडून आतापर्यंत केलेल्या तपासाचा अहवाल देखील मागवला आहे. तसेच यापुढे दर पंधरा दिवसांनी तपासाच्या प्रगतीचा अहवाल पोलिसांना पारनेर न्यायालयात जमा करण्याचे बंधनकारक केले आहे. तसे न केल्यास या न्यायालयाच्या अवमान प्रक्रियेला पारनेर पोलीसांना सामोरे जावे लागेल असा कडक ईशारा पारनेरच्या प्रथमवर्ग न्यायाधीश श्रीमती मुबीन शेख आदेशात दिलेला आहे. याप्रकरणी फिर्यादि असलेल्या कारखाना बचाव समितीची बाजू अँड.रामदास घावटे, अँड. उन्मेश चौधरी यांनी मांडली.

**पारदर्शक व निपक्ष तपास होईल**

**राजकीय हस्तक्षेप आणि आरोपींचे बडे प्रस्त यामुळे एका मोठ्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याचा तपास थंडावला होता. आता न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे यापुढील तपास पुर्णपणे पारदर्शक आणि निपक्षपणे होईल असा सतरा हजार पिडीत शेतकऱ्यांना विश्वास वाटतो आहे.**

**- बबनराव कवाद, साहेबराव मोरे**
**( सदस्य - कारखाना बचाव समिती )**

## प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना भारत भूषण राष्ट्रीय अवार्ड




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्या उच्च शिक्षण, विद्यार्थी विकास आणि समाजाभिमुख कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली असून, त्यांना भारत भूषण राष्ट्रीय अवार्ड या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नवी दिल्ली येथे झालेल्या समारंभात केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. कोठावळे यांनी महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) अंतर्गत स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, जलसंवर्धन आदी उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासोबतच राज्य शासनाच्या ‘करिअर कट्टा’ उपक्रमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, करिअर नियोजन, व्यक्तिमत्त्व विकास व रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करून सक्षम करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्यास डॉ. मनीष गवई, किरण महाले, हरदीप गिल, डॉ. बीजॉय महाराणा आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. कोठावळे यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव तथा खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास भुमरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजू नाना भुमरे, जिल्हा परिषद सदस्य शिवराज भैय्या भुमरे, संस्था प्रतिनिधी सतीश वाघ तसेच उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणे हेच संस्थेचे ध्येय - डॉ. भाऊसाहेब खिलारी

### ढोकेश्वर विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**टाकळी ढोकेश्वर –** ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे आणि त्यांच्या स्वप्नांना बळ मिळावे, यासाठी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था सातत्याने कार्यरत आहे. शिक्षण क्षेत्रात कोचिंगच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर लूट सुरू असून, पेपरफुटीसारख्या घटनांचा सर्वाधिक फटका ग्रामीण विद्यार्थ्यांना बसतो. मात्र स्वयंशिस्त आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर विद्यार्थी निश्चित यश मिळवू शकतात, असे प्रतिपादन संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले.

ढोकेश्वर ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित - परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एक वर्षापूर्वी सुरू करण्यात आलेल्या डॉ. सी. व्ही. रमण केंद्राच्या माध्यमातून सन २०२५-२६ मधील - परीक्षेत व या दोन्ही गटातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

गटात सुयोग शिंदे (९६.४१), भक्ती वाळुंज (९५.६६), सानिका शेळके (९२.८५), सोहम सोनावळे (९२.६१), श्रद्धा रोकडे (९१.३८), आदेश झावरे (९०.८०) यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गुण मिळवले. तर गटात समृद्धी वीरकर (९६.५१), भव्यता चौधरी (९६.१९), समीक्षा पवार (९१.९७), तन्मय रोकडे (९०.०६), आदित्य राऊत (८९.२०) यांच्यासह अन्य विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.

यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार डॉ. भाऊसाहेब खिलारी, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, पत्रकार चांद शेख, भोंद्रे गावचे सरपंच अभिजित झावरे यांच्या हस्ते करण्यात आला. या विद्यार्थ्यांना वर्षभर अशोक गांगड, अतिश झावरे, योगेश मांडगे, सचिन महानवर, भाऊसाहेब हिंगडे, सुनील झावरे, मंगेश पोपळघट, नितीन ढोकळे, सोनल शिंदे आणि मिना खाडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास संतोष सोनावळे, डॉ. अरुण झावरे, शंकर शेळके, छबुराव चौधरी, सूर्यभान भालेकर, संदीप बांडे, मेजर अशोक रोकडे, गणेश शिंदे, संतोष भांड, शांताराम आंधळे, भरत भांड, वनिता भांड, रावसाहेब रोकडे, संदीप रोकडे, बाळासाहेब झावरे, संजय शिंदे, यशवंत वीरकर यांच्यासह अनेक पालक व शिक्षक उपस्थित होते.

## विकासकामांच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सोडविणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट - आ. संग्राम जगताप

**मनपा प्रभाग क्रमांक १३ मध्ये नगरसेविका सुजाता गोरख पडोळे यांच्या प्रयत्नातून टिळक रोड राज पॅलेस रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** राज्य शासनाच्या माध्यमातून अहिल्यानगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला असून त्या निधीतून शहरात सांडपाणी व्यवस्था, रस्ता कॉंक्रिटीकरण, पायाभूत सुविधा आणि विविध विकासकामांना गती मिळाली आहे. नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामांमुळे नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होत असून शहराचा चेहरा-मोहरा बदलत आहे. विकसित शहराची ओळख निर्माण करण्यासाठी महापालिका आणि लोकप्रतिनिधी सातत्याने प्रयत्नशील आहेत. विकासकामांच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सोडविणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

मनपा प्रभाग क्रमांक १३च्या नगरसेविका सुजाता गोरख पडोळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टिळक रोड येथील राज पॅलेस हॉटेल परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरण कामासाठी निधी उपलब्ध झाला. या महत्त्वपूर्ण विकासकामाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक सुरेश बनसोडे, माजी नगरसेवक विपुल शेटीया, गोरख पडोळे, कांतीशेठ पटेल, जेठाशेठ पटेल, नरसीशेठ पटेल, पुरुषोत्तम पटेल, परेश दिवाणी, तुषार मुथा, रितेश सोनी मंडेचा, राजेंद्र एकाडे, विजय गांधी, राजू कानडे, संजय जोशी, रवी जाधव, सुरेश जाधव, बाळासाहेब शिंगवी, शरद ओके, अतुल जाधव, राकेश गांधी, शंकर पटेल, वैभव पटेल, वैभव जगताप, गोविंद सुनील ताठे, संतोष टेके, नंदू एकाडे, दिलीप जाधव, देवा जाधव, रमाकांत पाडळे, सोमा कानडे, विजय फुगारे, अभिजीत आवटी, निकुंज छेडा, केतन गुंदेचा, बाबू पाचरणे, राजाभाऊ ससे, अर्जुन बोरुडे, इंजि. गणेश गाडळकर, अमृत पटेल, अंबादास चौधरी, रमेश कोरडे, गणेश पालवे, संदेश मुनोत, हितेश मेहता, मनीष फुलडहाळे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नगरसेविका सुजाता गोरख पडोळे म्हणाल्या की, आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १३ मधील चारही नगरसेवकांना नागरिकांनी विश्वासाने निवडून दिले. त्या विश्वासाला पात्र ठरत प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. नियोजनबद्ध पद्धतीने एक-एक विकासकाम हाती घेऊन ते पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. टिळक रोड येथील राज पॅलेस हॉटेल परिसरातील रस्ता अत्यंत खराब झाला होता. या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण व्हावे यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध झाल्याने आता या परिसरात दर्जेदार आणि कायमस्वरूपी रस्त्याचे काम मार्गी लागणार आहे.

## ५४ वर्षांनंतर पुन्हा जुळले मैत्रीचे धागे; श्री ढोकेश्वर विद्यालयाच्या १९७२ च्या एसएससी बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आयुष्यातील अनेक चढ-उतार, शिक्षण, नोकरी, व्यवसाय, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक कार्याचा प्रदीर्घ प्रवास पूर्ण केल्यानंतर तब्बल ५४ वर्षांनी पुन्हा एकत्र आलेल्या श्री ढोकेश्वर विद्यालयाच्या १९७२ च्या एसएससी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. तारकराम झावरे यांच्या संकल्पसिद्धी निसर्गोपचार केंद्र, टाकळी ढोकेश्वर येथे २८ जून २०२६ रोजी झालेल्या या मेळाव्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, तर मैत्रीचे बंध अधिक दृढ झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विलास गोसावी यांनी प्रास्ताविक करून स्नेहमेळाव्याच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर उपस्थित प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाने स्वतः चा परिचय करून देताना एसएससीनंतरचा जीवनप्रवास उलगडला. शिक्षण, नोकरी, उद्योग-व्यवसाय, कौटुंबिक जबाबदाऱ्या, मुलांचे शिक्षण, समाजासाठी केलेले विविध उपक्रम, मिळालेले सन्मान व पुरस्कार तसेच निवृत्तीनंतर आनंदाने व्यतीत होत असलेल्या आयुष्यातील अनुभव सर्वांसमोर मांडले. प्रत्येकाच्या अनुभवातून संघर्ष, यश आणि समाधानाचा प्रेरणादायी प्रवास उलगडत गेला.

यावेळी सूर्यभान वाकळे सर, शिवाजी झावरे सर, सुनंदा गोरडे, मनोरमा पाटील-होळकर मॅडम तसेच उद्योगपती देवराम गागरे यांनी मनोगते व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थीदशेतील मैत्री, शिक्षकांचे संस्कार आणि आयुष्यातील विविध टप्प्यांवर आलेले अनुभव यांचा त्यांनी भावनिक शब्दांत उल्लेख केला. समाजासाठी सकारात्मक कार्य करत राहण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला.

स्नेहमेळाव्यात उद्योगपती देवराम गागरे यांनी उपस्थित सर्व ज्येष्ठांचा दैनंदिनी व गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. त्यानंतर उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तब्बल ५४ वर्षांनंतर झालेल्या या भेटीत अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. जुन्या आठवणी, शालेय जीवनातील किस्से, मित्रांशी झालेल्या गप्पा आणि एकमेकांबद्दल व्यक्त केलेल्या आत्मीयतेमुळे संपूर्ण वातावरण भावनिक आणि आनंदमय झाले.

यानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेत परस्परांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. उपस्थितांनी असा स्नेहमेळावा दरवर्षी आयोजित करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या स्नेहमेळाव्यास अण्णासाहेब वर्पे, ठका ढुस, बाबासाहेब झावरे, आनंदा पिंपरकर, काशिनाथ पायमोडे, पोपट झावरे, सखाराम ठाणगे, काशिनाथ थोपटे, आनंदा निवडुंगे, कोंडीभाऊ ढुस, किसन बांडे, रभाजी माने, देवराम नवले, संभाजी पाटील, रामदास झावरे, धोंडीभाऊ चेमटे, बबन वाकचौरे, ममता जाधव, देवराम गोरडे, रामदास देशमुख, रामदास आंधळे, बाळशिराम आंधळे, सौ. मंदा भास्करराव मोरे यांच्यासह अनेक जण कुटुंबीयांसह उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी ॲड. देवराम गोरडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. मैत्री, जिव्हाळा, आठवणी आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणारा हा स्नेहमेळावा उपस्थितांच्या स्मरणात कायमचा कोरला गेला.

## संविधान-पसायदान संगमभूमीचा ‘जनलोक संकल्प’




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील हुतात्मा स्मारक येथे भारतीय संविधान, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानातील विश्वकल्याणाच्या विचारांचा जागर करणारा ‘जनलोक संकल्प’ कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी भारतीय संविधानाच्या प्रतीकात्मक प्रतिच्या मागील कव्हरवर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ‘पसायदान’चे पान जोडून संविधानाला नैतिक मूल्यांची जोड देण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, रईस शेख, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, विजय शिरसाठ, वीरबहादूर प्रजापती, पोपट भोसले, ज्ञानदेव चांदणे, बाळासाहेब पालवे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे मनुस्मृती दहन करून सामाजिक समतेचा संदेश दिला होता. त्या ऐतिहासिक घटनेच्या शताब्दीकडे देश वाटचाल करत असताना समाजातून जातीय विषमता, भेदभाव आणि अन्याय पूर्णपणे नष्ट करण्यासाठी संविधानिक मूल्यांचा प्रसार अधिक व्यापक करण्याची गरज असल्याचे आयोजकांनी नमूद केले. ‘जनलोक संकल्प’ अंतर्गत जातीयतेला नकार, धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्थेचा स्वीकार, संविधानातील मूलभूत कर्तव्यांचे पालन, संत ज्ञानेश्वरांच्या विश्वबंधुत्वाच्या विचारांचा प्रसार आणि लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी सामाजिक सहभाग वाढविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीचे धनादेश सुपूर्त



अहिल्यानगर - अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून सभासदांच्या सुख-दुःखात सहभागी होणारी सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था आहे. महानगरपालिकेतील कर्मचारी दिवसभराच्या धकाधकीच्या कामकाजामुळे अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे विविध आजारांना त्यांना सामोरे जावे लागते. काही कर्मचारी आर्थिक परिस्थितीमुळे वेळेवर तपासणी व उपचार करू शकत नाहीत. आजाराचे वेळेवर निदान व उपचार होणे अत्यंत आवश्यक असल्याने पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीचा हात दिला जात असल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल यांनी दिली. अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासद मच्छिंद्र राजगुरू, सुभाष साठे आणि भीमसेन घोरपडे यांना वैद्यकीय उपचारासाठी प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे धनादेश प्रदान करण्यात आले.यावेळी व्हाईस चेअरमन कैलास चावरे, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसार, ज्येष्ठ संचालक सतीश ताठे, संचालक अजय कांबळे, किशोर कानडे, बलराज गायकवाड, विजय कोतकर, गुलाब गाडे, विकास गीते, सोमनाथ सोनवणे, बाळासाहेब पवार, शेखर देशपांडे, संचालिका प्रमिला पवार तसेच कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी उपस्थित होते. यावेळी व्हाईस चेअरमन कैलास चावरे म्हणाले की, पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांच्या हिताचे विविध निर्णय सातत्याने घेतले जात असून त्यांच्या सुख-दुःखात संस्था नेहमीच मदतीचा हात देत असते. विशेषतः वैद्यकीय उपचारांसाठी तातडीची आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याला प्राधान्य दिले जाते. सभासदांचे आरोग्य सुरक्षित राहावे आणि उपचाराअभावी कोणालाही अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी पतसंस्था कायम कार्यरत राहणार आहे, असे त्यांनी सांगितले.

### प्रसिद्ध लेखक भास्कर देशमुख यांचे निधन

अहिल्यानगर - ज्येष्ठ साहित्यिक, निवृत्त प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी तथा विपुल



लेखन करणारे लेखक भास्कर पर्वतराव देशमुख यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर अहिल्यानगर येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी साहित्य, सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शासकीय सेवेत त्यांनी मराठवाडा विभागाचे प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी म्हणून सुमारे २० वर्षे उल्लेखनीय सेवा बजावली. प्रशासकीय जबाबदारी सांभाळतानाच त्यांनी साहित्य क्षेत्रातही सातत्याने योगदान दिले. सन १९६३ ते १९८४ या कालावधीत विविध साप्ताहिके व मासिकांमध्ये त्यांनी लघुकथा आणि लेख लिहिले. लोकसत्तामधील 'कवडसे' या सदरातील त्यांचे लेखन विशेष लोकप्रिय ठरले. १९८४ मध्ये जनसेवा प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केलेली 'प्राइस' ही त्यांची पहिली मराठी कादंबरी वाचकांच्या पसंतीस उतरली. त्यानंतर २००२ पासून त्यांनी कादंबरी, बालसाहित्य आणि विविध साहित्यप्रकारांमध्ये विपुल लेखन केले. भास्कर देशमुख यांनी आपल्या साहित्य कारकीर्दीत तब्बल १७० पुस्तकांचे लेखन केले. त्यापैकी मनोरमा प्रकाशन, अक्षरवेध प्रकाशन, सुपर्ण प्रकाशन आणि ललित प्रकाशन यांसारख्या नामांकित प्रकाशन संस्थांनी १६० पुस्तके प्रकाशित केली.चित्रपट क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. लेखक राम केळकर आणि प्रफुल्ल पारेख यांच्यासोबत पटकथा व संवाद लेखन केले. तसेच 'झिप्री' आणि 'कंट्रोल झेड' या चित्रपटांसाठी कथा, पटकथा, संवाद आणि गीतलेखन केले. विविध विषयांवरील अनेक लघुपटांचे लेखनही त्यांनी केले होते. त्यांच्या निधनाने साहित्य, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील एक अभ्यासू, संवेदनशील व बहुआयामी व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत असून, विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# मोबाईलच्या युगात ज्याच्या हातात पुस्तक, त्याचेच भविष्य उज्ज्वल - प्रा. अनिरुद्ध अडसूळ

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने आयोजित पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिनानिमित्त राज्यस्तरीय खुली वकृत्व, चित्रकला व निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. जिंकणे-हरणे यापेक्षा प्रयत्न करण्याची वृत्ती महत्त्वाची असून सातत्य, जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावरच जीवनात यश संपादन करता येते. आजच्या मोबाईलच्या युगात ज्याच्या हातात पुस्तक असेल, त्याचेच भविष्य उज्ज्वल होणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचा, गुरुजनांचा आणि आपल्या शहराचा अभिमान वाटेल असे कार्य उभे करावे. विचार भारती संस्थेने विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमधून स्वतःचे विचार मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून ही अत्यंत कौतुकास्पद बाब असल्याचे प्रतिपादन प्रा. अनिरुद्ध अडसूळ यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने आयोजित पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव आणि अहिल्यानगर गौरव दिनानिमित्त घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय खुल्या वकृत्व, चित्रकला व निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी प्रा. अनिरुद्ध अडसूळ, प्राचार्य बाळासाहेब सागडे, शिवचरित्रकार तथा व्याख्याते प्रा. अशोक बागर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, चंद्रकांत तागड, राजेंद्र मचे, अशोक सागडे, पुष्कर कुलकर्णी, ऐश्वर्या सागडे, राहुल गांधी, प्रा. संदीप कांबळे, प्रा. अनिल गर्जे, प्रा. राधाकिसन जोशी, प्रा. मच्छिंद्र माळुंजकर यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य बाळासाहेब सागडे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नेतृत्व दूरदृष्टीचे, लोकाभिमुख आणि समाजहिताचे होते. त्यांच्यातील निर्णयक्षमता ही आजही प्रेरणादायी आहे. विचार भारती संस्थेने त्यांच्या जीवनकार्यावर आधारित निबंध, चित्रकला आणि राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांसमोर महापुरुषांचे विचार पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. अशा उपक्रमांतून सुसंस्कृत आणि विचारशील पिढी घडण्यास निश्चितच मदत होईल. मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे आजची पिढी कोणत्या दिशेने चालली आहे, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. महापुरुषांचे विचार आजच्या युवा पिढीला ऊर्जा, प्रेरणा आणि योग्य दिशा देणारे आहेत, असे त्यांनी सांगितले.

यावेळी शिवचरित्रकार प्रा. अशोक बागर यांनी विद्यार्थ्यांसमोर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा सविस्तर आढावा मांडत त्यांच्या कर्तृत्वाची ओळख करून दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले. सूत्रसंचालन अशोक सागडे आणि ऐश्वर्या सागडे यांनी केले, तर पुष्कर कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले विचार व्यक्त करण्याचे प्रभावी व्यासपीठ मिळाले असून महापुरुषांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विचार भारती संस्थेच्या माध्यमातून घडत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठामध्ये जामीन मंजुर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** याबाबत सविस्तर वृत्त असे की, पाथर्डी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १३८७/२०२५ हा दिनांक १३.१२.२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता कलम १०३/१, १४०/१, ११५/२, ३५२, ३/५ नुसार आरोपी प्रदिप उर्फ बाळु विश्वास गर्जे याच्या विरोधात दाखल झाला होता. फिर्यादीने फिर्याद दिली होती की, नोव्हेंबर २०२५ मध्ये अकोले गावातील विश्वास गर्जे यांच्याकडील फिर्यादीच्या वडिलांस चालक नेमुन २०००० रुपये उचल दिली होती व गाडीवर येण्यास सांगितले होते. त्यानंतर फिर्यादीच्या वडिलांनी सदरील ६ टायर ट्रक गाडीवर ८ दिवस काम केले होते. दिनांक ०२.१२.२०२५ रोजी फिर्यादीच्या वडीलांनी गाडी मालक यांच्या गावी गाडी लावुन कुटुंबातील लोकांना सांगितले की, गाडीच्या कामाचा हिशोब केला असुन गाडीमालक १६००० रुपये मागत आहे. त्यानंतर आरोपी प्रदिप गर्जे व इतर यांनी फिर्यादीच्या वडिलांना भेटुन वेळोवेळी पैशाचा तगादा लावला होता. दिनांक ११.१२.२०२५ रोजी फिर्यादीच्या वडिलांनी प्रदिप गर्जे व इतर यांनी त्यास किडनॅप केले असुन आरोपीच्या घरी आणले आहे असे फोन करुन सांगितले आहे तदनंतर दिनांक १३.१२.२०२५ रोजी फिर्यादीच्या वडिलांचे प्रेत अकोले गावातील शिवारीत आरोपीच्या घराशेजारी विहिरीत मिळुन आले व तदनंतर दिनांक २२.१२.२०२५ रोजी सिव्हील हॉस्पीटल येथील पी. एम. रिपोर्टचे अवलोकन केल्यानंतर खुनाच्या गुन्ह्याची वाढ करण्यात आली होती. सदरील प्रकरणामध्ये आरोपीचा जामीन सत्र न्यायालयाने रद्द केल्यानंतर आरोपीने मा. उच्च न्यायालयामध्ये ॲड. एन. बी. नरवडे यांच्यामार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. तसेच सदरील जामीन अर्जामध्ये युक्तीवाद करतांना दोषारोपपत्रामधुन खुनाचा गुन्हा निष्पन्न होत नसल्याचे दाखवुन दिल्यानंतर मा. उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती एस. एस. ठोंबरे यांनी आरोपीस जामीन मंजुर केला.

सदर प्रकरणामध्ये आरोपीच्या वतीने ॲड. एन. बी. नरवडे यांनी काम पाहिले.

# मोहरम उत्सव शांततेत पार पाडणाऱ्या पोलीस दलाचा सन्मान

### हाजी हमीद तकिया ट्रस्टच्या वतीने पोलीस अधिकारी व पोलीसांचा गौरव; सलग २२ तास अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीसांच्या कार्याला सलाम



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील ऐतिहासिक मोहरम उत्सव यंदा शांततेत आणि अत्यंत उत्साहात पार पडला. उत्सवादरम्यान सलग २२ तास अहोरात्र कर्तव्य बजावून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा हाजी हमीद तकिया ट्रस्ट'च्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या सत्कार सोहळ्यात माननीय पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, पोलीस उपअधीक्षक वैभव कलुबर्मे, शहर उपअधीक्षक दिलीप टिपरसे, तसेच तोफखाना व कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व कर्मचारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हाजी हमीद तकिया ट्रस्टचे सय्यद साबिर अली, 'स्नेहलय'चे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, रोहित मिस्किन, 'स्नेहलय इंग्लिश स्कूल'च्या मानद संचालिका श्रीमती कांचन पापडेजा यांनी पोलीस अधिकारी व पोलीसांचा सत्कार केला.

या कार्यक्रमाप्रसंगी स्टचे विश्वस्त अली सय्यद, सय्यद गालिब अली, सय्यद मोहम्मद अली, सय्यद राहबर अली, सय्यद रजा, सय्यद बिलाल, सय्यद शहा, सय्यद उवेज, रेहान शेख, अबूबकर शेख, ॲड. अनिकेत राठोड, राहुल चिंतामणी, मुस्तकीम भाई, फरान शेख, रेहान शेख, फरीद शेख तसेच ट्रस्टचे इतर विश्वस्त आणि मान्यवर उपस्थित होते.

स्टच्या वतीने मोहरम उत्सव शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने केलेल्या नियोजन, सतर्कता आणि समर्पित सेवाभावाचे कौतुक करत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या उपक्रमातून सामाजिक सलोखा, परस्पर विश्वास आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देखील मिळाल्याचे स्पष्ट करण्यात आले.

जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांनी पोलीस दलाच्या वतीने युवक-युवतींसाठी महाविद्यालयीनस्तरावर व्यसनमुक्तीचा उपक्रम घेतला जाणार असल्याची माहिती दिली. सय्यद साबिर अली यांनी हाजी हमीद तकिया ट्रस्ट व गिरीश कुलकर्णी यांनी स्नेहालय परिवार या उपक्रमात सहभागी होणार असल्याचे सांगितले.

# जिद्दीच्या बळावर खाकीची स्वप्न साकार

### नेवाशाच्या सानिया पठाणची महाराष्ट्र पोलीस दलात निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**नेवासा–** परिस्थितीवर मात करून जिद्द आणि चिकाटीच्या बळावर यशाला गवसणी घालत नेवासे शहरातील कु. सानिया निसार पठाण हिने दाखवून दिले आहे. तिची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याबद्दल नेवासे येथे तिचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. सानिया हिने मिळवलेले हे यश तिच्या अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि संघर्षमय प्रवासाचे फलित आहे.

वडील व्यवसायाने फिटर असलेल्या सानियाला लहानपणापासूनच खाकी वर्दीचे आकर्षण होते. घरची परिस्थिती बेताची असतानाही तिने हार मानली नाही. खाकी वर्दीचे स्वप्न उराशी बाळगून तिने अहोरात्र मेहनत घेतली. लेखी परीक्षा, मैदानी चाचणी आणि मुलाखत या सर्व टप्प्यांवर तिने यशस्वी कामगिरी करून पोलीस दलात स्थान मिळवले.

सानियाचा हा संघर्षमय प्रवास अनेक युवक-युवतींसाठी प्रेरणादायी आहे नेवासे व संगमनेर येथे झालेल्या सत्कार कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी तिच्या कर्तृत्वाचे कौतुक केले.

# अहमदनगर मर्चंट बँकेच्या चेअरमनपदी संजय चोपडा यांची बिनविरोध निवड

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जाहीर सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहमदनगर मर्चंट बँकेच्या चेअरमनपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते संजय चोपडा यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्कार समारंभाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक बाळासाहेब पवार, डॉ. सागर बोरुडे, प्रकाश भागानगरे, बाबुशेठ नागरगोजे, संतोष गेनप्पा, गोरख पडोळे, अनुप काळे, सुनील त्रिंबके, सागर मुर्तडकर, अवधूत फुलसौंदर, सुरज कोतकर, गणेश बोरुडे, दीपक खेडकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, अहमदनगर मर्चंट बँकेची जिल्ह्यात एक विश्वासार्ह, सक्षम आणि नामवंत सहकारी बँक म्हणून ओळख आहे. या बँकेने व्यापारी, उद्योजक आणि व्यावसायिकांना आर्थिक बळ देत शहराच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्राहकांचा विश्वास संपादन करत बँकेने प्रगतीचा आदर्श निर्माण केला असून संजय चोपडा यांच्या नेतृत्वाखाली बँकेची ही वाटचाल अधिक गतिमान होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी अहमदनगर मर्चंट बँकेचे नूतन चेअरमन संजय चोपडा यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या या सन्मानाबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. बँकेच्या संचालक मंडळाने माझ्यावर दाखविलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे.

# शिक्षणासोबत संस्कारही तितकेच महत्त्वाचे; विद्यार्थ्यांनी पालक व देशाचे नाव उज्ज्वल करावे - महापौर ज्योती गाडे

### पद्मशाली स्नेहिता संगमतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; विविध क्षेत्रातील मान्यवरांचाही गौरव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या शर्यतीत न धावता शिक्षणासोबत संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव जोपासली पाहिजे. शाळा व महाविद्यालयात नियमित उपस्थित राहून शिक्षण घेतल्यास पालकांवरील आर्थिक भारही कमी होतो. विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाने पालकांसह देशाचेही नाव उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन अहिल्यानगरच्या महापौर सौ. ज्योती गाडे यांनी केले.

पद्मशाली स्नेहिता संगमच्या वतीने आयोजित दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सत्कार समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. गेल्या सलग २६ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या उपक्रमामुळे समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहर बँकेचे संचालक दत्तात्रय रासकोंडा होते. यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, भाजप गटनेते नगरसेविका शारदाताई ढवण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या सौ. शितल अजय ढोणे तसेच सक्सेस सायन्स अकॅडमीचे संचालक प्रा. इंजी. सुजित वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी आजच्या बदलत्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे महत्त्व विशद केले. काळानुरूप ज्ञान संपादन करून स्वतःला सक्षम व स्पर्धात्मक बनविण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

भाजप गटनेते नगरसेविका शारदाताई ढवण यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्येकाने आपल्या वाढदिवशी किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे सांगितले. शिक्षणामुळे माणूस सुसंस्कृत होतो. स्वातंत्र्याच्या मर्यादा ओळखून जबाबदारीने वागावे आणि आई-वडिलांचे नाव मोठे करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या सौ. शितल ढोणे यांनी पद्मशाली स्नेहिता संगमच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी केवळ गुण मिळविण्यावर भर न देता समाजकार्य, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासालाही तितकेच महत्त्व द्यावे. चांगले नागरिक घडविण्यात अशा उपक्रमांची महत्त्वाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख वक्ते प्रा. इंजी. सुजित वाघ यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना प्रत्येकाने आपले ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असा सल्ला दिला. आत्मविश्वास हीच यशाची खरी गुरुकिल्ली असून गरिबी कधीही शिक्षणातील अडथळा ठरत नाही. जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांसाठी आपल्या संस्थेत प्रवेश घेताना फीमध्ये २५ टक्के सवलत जाहीर केली.

प्रास्ताविक पद्मशाली स्नेहिता संगमच्या अध्यक्षा डॉ. रत्नाताई बल्लाळ यांनी केले. त्यांनी संस्थेच्या २६ वर्षांच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा घेतला. उपाध्यक्षा रेखा वड्डेपल्ली व सचिव सपना छिंदम यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

# आज झाडांची काळजी घेतल्यास, भविष्यात निसर्ग मानवाची काळजी घेईल - ह.भ.प. रमेश आप्पा महाराज

**जय हिंद फाउंडेशनच्या १०० वडांच्या वृक्षलागवड अभियानाला प्रारंभ । तोंडोळी परिसर हिरवागार करण्याचा निर्धार; रेणुकामाता मंदिर ते हरिहरेश्वर मंदिर परिसरात होणार वृक्षारोपण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आणि वटपौर्णिमेच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधत जय हिंद फाउंडेशनच्या वतीने शंभर वडाच्या झाडांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ पाथर्डी तालुक्यातील तोंडोळी गावातून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. सामाजिक, धार्मिक आणि पर्यावरणीय जाणीव एकत्रित करणाऱ्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

या अभियानाच्या प्रारंभी आयोजित कार्यक्रमाला ह.भ.प. रमेश आप्पा महाराज, ह.भ.प. हरिश्चंद्र महाराज दगडखैर, ह.भ.प. पोपट महाराज फुंदे, उपसरपंच सतीश वारंगुळे, विश्वस्त रामेश्वर लोहिया, गोपी काका, भाऊसाहेब काकडे, राजाभाऊ वारंगुळे, बाळासाहेब देवढे, दत्ताअण्णा वारंगुळे, मल्हारी वारंगुळे, विकास राठोड, कानिफनाथ वारंगुळे, अनिल दौंड, दत्ता मांडे, आदित्य शिंदे, दिनेश शिंदे, नवनाथ महाराज यांच्यासह जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, श्रीकृष्ण काकडे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या अभियानांतर्गत तोंडोळी येथील रेणुकामाता मंदिर परिसर, तोंडोळी फाटा ते रेणुकामाता मंदिर या रस्त्याच्या दुतर्फा, हरिहरेश्वर मंदिर परिसर, धोम्य ऋषींच्या वास्तव्याने पावन झालेला शिखर टेंभी परिसर तसेच अमरधाम तोंडोळी या परिसरात मोठ्या प्रमाणावर वडाच्या झाडांची लागवड करण्यात येणार आहे. पर्यावरण संरक्षणाबरोबरच भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी ह.भ.प. रमेश आप्पा महाराज यांनी जय हिंद फाउंडेशनच्या कार्याचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, ‘‘जय हिंद फाउंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची चळवळ राबवत आहे. फाउंडेशनचे शिवाजी पालवे यांच्या पुढाकारातून जिल्हाभरात हजारो वडाच्या झाडांची लागवड झाली असून, पर्यावरण रक्षणासाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. आज झाडांची काळजी घेतल्यास निसर्ग भविष्यात मानवाची काळजी घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ह.भ.प. पोपट महाराज फुंदे यांनीही वटपौर्णिमेच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे स्वागत करत, धार्मिक परंपरेसोबत पर्यावरण संवर्धनाची सांगड घालणारा हा आदर्श उपक्रम असल्याचे नमूद केले. उपसरपंच सतीश वारंगुळे यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने लावण्यात येणारी सर्व झाडे जतन करून ती जगविण्याची जबाबदारी स्वीकारत, ‘‘वृक्ष लागवड ही केवळ सुरुवात आहे; त्यांचे संगोपन आणि संवर्धन हेच खरे पर्यावरण रक्षण आहे,’’ असे सांगितले. तसेच जय हिंद फाउंडेशनचे आभार मानत भविष्यातही अशा उपक्रमांना गावाचा सक्रिय पाठिंबा राहील, अशी ग्वाही दिली.

# आठ दिवसांत वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास सावेडी वीज उपकेंद्राला टाळे ठोकणार – माजी उपमहापौर अनिल बोरुडे

**सावेडी बालिकाश्रम रोड परिसरात विजेचा लपंडाव; वारंवार खंडित वीजपुरवठ्याने नागरिक हैराण**
**कमी–जास्त व्होल्टेजमुळे घरातील विद्युत उपकरणांचे नुकसान; नागरिकांना आर्थिक फटका**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरातील सावेडी, बालिकाश्रम रोड, सुडके मळा, बोरुडे मळा, धर्माधिकारी मळा, भुतकरवाडी, भिंगारदिवे मळा आणि शिंदे मळा या परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून विजेचा अक्षरशः लपंडाव सुरू असून वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सतत कमी–जास्त होणाऱ्या विद्युत प्रवाहामुळे घरातील टीव्ही, फ्रीज, पंखे, पाण्याच्या मोटारी तसेच इतर महागडी विद्युत उपकरणे जळत असून नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. दैनंदिन कामकाज, विद्यार्थ्यांचा अभ्यास, नोकरदारांचे ऑनलाइन काम तसेच



व्यावसायिकांचे व्यवहार यावरही याचा विपरीत परिणाम होत असून नागरिकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

या गंभीर प्रश्नाची दखल घेत माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे आणि पुष्कर कुलकर्णी यांनी महावितरण प्रशासनाला कडक इशारा दिला आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, येत्या आठ दिवसांत सावेडी उपनगरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला नाही, वारंवार होणारे ट्रिपिंग आणि कमी–जास्त व्होल्टेजचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला गेला नाही, तर सावेडी येथील महावितरणच्या वीज उपकेंद्राला टाळे ठोकून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.

त्यांनी पुढे सांगितले की, महावितरणने नागरिकांना अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठा करणे ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे. वारंवार होणाऱ्या बिघाडामुळे नागरिकांच्या घरातील लाखो रुपयांची विद्युत उपकरणे खराब होत आहेत. या नुकसानीची जबाबदारी महावितरण प्रशासनाने स्वीकारून तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात.

सावेडी उपनगरातील नागरिकांनीही वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करत प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. अन्यथा जनआंदोलन उभारण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# ५ जुलैला राळेगणसिद्धीतून राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण यात्राचा शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांच्या ज्वलंत प्रश्नावर जनजागृती निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने ५ जुलै रोजी राळेगणसिद्धी येथून राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण यात्रा व पदाधिकारी सन्मान अभियानाचा शुभारंभ ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिली.

पारनेर तालुका हा क्रांतीकारक, राष्ट्रभक्त आणि समाजसेवकांचा तालुका म्हणून ओळखला जातो. याच भूमीतून समाजकार्यासाठी आयुष्य समर्पित करणारे अण्णा हजारे यांचे कार्य प्रेरणादायी आहे. त्याच पारनेर तालुक्यातील राळेगणसिद्धी–नारायणगव्हाण शिवरस्त्याच्या प्रश्नातून सुरू झालेल्या संघर्षाने आज राज्यव्यापी चळवळीचे रूप धारण केले आहे.

शरद पवळे म्हणाले की, ‘‘माझा रस्ता होवो अथवा न होवो, जोपर्यंत शेवटच्या शेतकऱ्याला दर्जेदार शेतरस्ता मिळत नाही, तोपर्यंत संघर्ष थांबवणार नाही,‘‘ या संकल्पनेतून शिव पाणंद शेतरस्ता चळवळीची उभारणी झाली. शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी हा संदेश घेऊन चळवळ राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे.

ते म्हणाले की, ही चळवळ कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून, शेतरस्ते अडवून शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या प्रवृत्तीविरोधात आणि प्रशासकीय त्रुटींमुळे शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आहे. शेतरस्ता बंद झाल्यास केवळ मार्ग बंद होत नाही, तर शेतकरी कुटुंबाचे आर्थिक, सामाजिक आणि मानसिक नुकसान होते.

# पहिल्या अहिल्यानगर जिल्हा पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी

**नेक्स्ट लेव्हल फिटनेसचा सोहम गड्डम ठरला स्ट्राँग मॅन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पहिल्या अहिल्यानगर जिल्हा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली. यामध्ये सोहम गड्डम याने तब्बल ४८७.५ किलो वजन उचलत स्ट्राँग मॅन हा मानाचा किताब पटकावून स्पर्धेचे प्रमुख आकर्षण ठरला.

नुकत्याच नेक्स्ट लेव्हल फिटनेस येथे पार पडलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन नगरसेवक करण कराळे यांच्या हस्ते झाले. जिल्ह्यातील विविध भागांतील पॉवरलिफ्टिंगपटूंनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धेतील सब–ज्युनियर गटात नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या जान्हवी रुपेश गायकवाड, तुबा अस्मिर सय्यद, साहिल कासोटे, सार्थक गाडे, सोहम गड्डम आणि फहाद पठाण यांनी आपल्या–आपल्या वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. तर मयांक कनोजिया याने रौप्यपदक आणि अर्णव इंगवले याने कांस्यपदक मिळविले.

ज्युनियर गटात याज्ञा लांडगे आणि हर्षल गाडे यांनी सुवर्णपदकाची कमाई केली. वरिष्ठ गटात स्वामिनी काकडे हिने सुवर्णपदक जिंकले, तर मास्टर–१ गटात अर्चना काळे यांनी सुवर्णपदक पटकावत आपला ठसा उमटविला.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट कामगिरी करत सोहम गड्डम याने एकूण ४८७.५ किलो वजन उचलून स्ट्राँग मॅन हा प्रतिष्ठेचा किताब आपल्या नावावर केला.

या सर्व खेळाडूंना अहिल्यानगर पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष डेव्हिड मकासरे, विजय कनोजिया, ओंकार गुरम आणि रुपेश गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

दरम्यान, २७ जून २०२६ रोजी मुंबई येथे झालेल्या महापौर चषक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतही नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश मिळविले. अस्मिरोद्दीन सय्यद याने सुवर्णपदक, रुषी काळसे, वैभव दुधे आणि याज्ञा लांडगे यांनी रौप्यपदके पटकावत संस्थेच्या यशात आणखी भर घातली.

या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व पदक विजेत्या खेळाडूंचा नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे संचालक व प्रशिक्षक ओंकार गुरम, विजय कनोजिया तसेच संस्थेच्या सदस्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# नेप्ती सोसायटीच्या प्रगतीत खुंटाळे यांचे योगदान - माजी सरपंच संजय जपकर

**नेप्ती ग्रामस्थांकडून सोसायटीचे सचिव खुंटाळे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार सन्मान करून कर्तुत्वाचा गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सचिव राजेंद्र खुंटाळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. अनेक वर्षे प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने व सभासदांच्या हिताला प्राधान्य देत केलेल्या उल्लेखनीय सेवेसाठी ग्रामस्थांनी कृतज्ञता व्यक्त केली. माजी सरपंच संजय जपकर, उपसरपंच एकनाथ जपकर आणि सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन खुंटाळे यांचा सन्मान करण्यात आला. अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी दिली.

सोसायटीची आर्थिक शिस्त, सभासदांचा विश्वास, कर्जवाटपातील पारदर्शकता आणि विकासाभिमुख निर्णय यामुळे नेप्ती सेवा सोसायटीला वेगळी ओळख मिळाली असून त्यामध्ये खुंटाळे यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. सचिव म्हणून काम करताना राजेंद्र खुंटाळे यांनी केवळ कार्यालयीन जबाबदाऱ्या पार पाडल्या नाहीत, तर सभासदांचा विश्वास जपत सेवा सोसायटीला सक्षम आणि विश्वासार्ह संस्था म्हणून उभी करण्याचे मोठे कार्य केले. त्यांच्या कामात प्रामाणिकपणा, शिस्त, संयम आणि पारदर्शकता या गुणांचे दर्शन नेहमीच घडले. त्यामुळेच सोसायटीच्या प्रत्येक निर्णयावर सभासदांनी विश्वास ठेवला. नेप्ती सेवा सोसायटीच्या प्रगतीत राजेंद्र खुटाळे यांचे मोठे योगदान आहे असे प्रतिपादन माजी सरपंच संजय जपकर यांनी केले.



ते पुढे म्हणाले, ‘‘आज खुंटाळे सेवानिवृत्त होत असले तरी त्यांनी निर्माण केलेली कार्यसंस्कृती आणि विकासाचा वारसा पुढील पिढीला प्रेरणा देणारा आहे. कोणतीही संस्था केवळ इमारतींमुळे मोठी होत नाही, तर त्यामागे निष्ठेने काम करणारी माणसे असतात. राजेंद्र खुंटाळे हे त्यापैकीच एक आहेत. त्यांच्या सेवेमुळे नेप्ती सेवा सोसायटीने प्रगतीची अनेक टप्पे गाठले असून त्यांचे योगदान ग्रामस्थ कधीही विसरणार नाहीत. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देतो.‘‘

सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ‘‘राजेंद्र खुंटाळे यांनी आपल्या सेवाकाळात सभासदांना आपलेपणाने मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्येक काम जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे पूर्ण केले. त्यांच्या कार्यामुळे सोसायटीची विश्वासार्हता अधिक वाढली. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचा अनुभव समाजाच्या विकासासाठी उपयोगी पडेल, असा विश्वास व्यक्त करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.‘‘

सत्काराला उत्तर देताना राजेंद्र खुंटाळे यांनी ग्रामस्थ, सभासद, संचालक मंडळ आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या सेवाकाळात सर्वांच्या विश्वासामुळेच जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडता आल्या, असे सांगत त्यांनी मिळालेला सन्मान हा आयुष्यभर जपून ठेवणारी अमूल्य आठवण असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमास जिल्हा बँकेचे शाखा व्यवस्थापक गजेंद्र क्षीरसागर , माजी सरपंच संजय जपकर, उपसरपंच एकनाथ जपकर, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले , ग्रामसेवक प्रवीण पानसंबळ ,माजी उपसरपंच बाबासाहेब होळकर , दादू चौगुले, बंडू जपकर ,चेअरमन सुरेंद्र होळकर, व्हाईस चेअरमन सादिक पवार, संचालक जालिंदर शिंदे, उमर सय्यद, अंबादास जपकर, राजेंद्र जपकर, सुरेश कदम, राजाराम जपकर, भाऊसाहेब होळकर, अशोक जपकर, मुक्ता कांडेकर, विलास जपकर, मच्छिंद्र होळकर, भास्कर जपकर, शांताबाई जपकर, जमीर सय्यद अमोल चौगुले माजी सचिव अशोक होळकर ,रामराव कांडेकर यांच्यासह ग्रामस्थ व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत भावनिक आणि उत्साहपूर्ण होते. उपस्थितांनी राजेंद्र खुंटाळे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या कार्याचा आदर्श भावी पिढीने घ्यावा, अशी भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.

(पान १ वरून)

## अण्णांचे आरोग्य जपा, उपोषणाची वेळ येऊ देऊ नका

सकारात्मक संवाद साधून मार्ग काढावा.‘‘आमदार दाते सरांनी अण्णासाहेब हजारे यांच्याविषयी व्यक्त केलेली ही आत्मीयता आणि त्यांच्या आरोग्याबाबत व्यक्त केलेली चिंता सभागृहाचे विशेष लक्ष वेधून घेत होती. मतदारसंघातील ज्येष्ठ समाजसेवकांचा सन्मान राखत, त्यांच्या आंदोलनामागील विषयावर शासनाने संवेदनशील भूमिका घ्यावी, अशी स्पष्ट अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## शेतकऱ्याने ठोकले कुलूप

दोन्ही गोष्टींवर त्वरित तोडगा काढण्याची गरज आहे.अंगणवाडी भरतीचा मुद्दाही ऐरणीवर एकनाथवाडी येथील अंगणवाडी मदतनीस पदभरतीतही राजकीय हस्तक्षेप करून नियम डावलले गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अपंग महिलेकडे आरक्षणासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याची तक्रार अर्ज देऊनही प्रशासनाने त्याची दखल घेतलेली नाही. तीव्र आंदोलनाचा इशारा शाळेचा मोबदला आणि अंगणवाडी भरती या दोन्ही मुद्द्यांमुळे ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र असंतोष आहे. एका महिन्याच्या आत हे दोन्ही प्रश्न निकाली निघाले नाहीत, तर मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, महसूल मंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## कोपरगाव व पारनेर परिसरात अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

(वय २९, दोघे रा. इंदिरानगर, कोपरगाव) आणि रवी सुनील सोनवणे (वय १८, रा. येसगाव, कोपरगाव) यांच्यावर भारतीय न्याय संहितेचे कलम ३०३(२), ३(५) व गौण खनिज अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारनेर पोलीस ठाणे हद्दीत २ ब्रास वाळूसह ८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत दत्तात्रय नाना मेंगाळ (वय २१, रा. खडकवाडी, पारनेर) या आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे, दीपक मेढे तसेच पोलीस अंमलदार विजय पवार, बाळासाहेब नागरगोजे, सागर ससाणे, बाळासाहेब गुंजाळ, प्रकाश मांडगे, अमोल आजबे, सतीश भवर, विशाल तपनुरे आणि चालक उत्तरेश्वर मोराळे, अरुण मोरे यांच्या पथकाने केली.

## ‘ग्राउंड फ्लोअरवरच जागा द्या; अन्यथा महापालिकेविरोधात अवमान याचिका’

वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संघटनेचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी मूळ गाळेधारक व ओटेधारकांच्या पुनर्वसनाचा मुद्दा ठामपणे मांडत, व्यापारी संकुलातील जागा ग्राउंड फ्लोअरवरच देण्याची मागणी केली.

अहिल्यानगर शहरातील सर्वसामान्य नागरिकांना ताज्या भाज्या सहज उपलब्ध व्हाव्यात आणि गोरगरीब भाजी विक्रेत्यांना कायमस्वरूपी व्यवसायाचे ठिकाण मिळावे, या उद्देशाने तत्कालीन नगराध्यक्ष स्वर्गीय नवनीतभाई बार्शीकर यांच्या कार्यकाळात चितळे रोडवरील मध्यवर्ती ठिकाणी नेहरू मार्केटची उभारणी करण्यात आली होती. अनेक वर्षे शेकडो कुटुंबांचा उदरनिर्वाह या मार्केटवर अवलंबून होता. मात्र, महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर या जागेवर आधुनिक व्यापारी संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आणि सुमारे १५ वर्षांपूर्वी नेहरू मार्केट जमीनदोस्त करण्यात आले. त्यानंतर मूळ गाळेधारक व ओटेधारकांना पर्यायी व्यवस्था न मिळाल्याने अनेकांना रस्त्यावर व्यवसाय करण्याची वेळ आली.

पुनर्वसनाच्या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांत गाळेधारकांनी व भाजी विक्रेता संघटनेने विविध आंदोलने, निवेदने आणि पाठपुरावा केला. मात्र, प्रश्न मार्गी न लागल्याने संघटनेचे अध्यक्ष संजय झिंजे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. या प्रकरणात अहिल्यानगर महानगरपालिकेने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून नेहरू मार्केटमधील १४ गाळेधारक आणि ७० ओटेधारक भाजी विक्रेत्यांचे नव्या व्यापारी संकुलामध्ये पुनर्वसन करण्यात येईल, अशी स्पष्ट हमी दिली होती. बैठकीत संघटनेने याच प्रतिज्ञापत्राची प्रत दाखवत प्रशासनाला त्याची जाणीव करून दिली.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, महापालिकेने न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार ७० ओटेधारकांकडून केवळ नाममात्र भाडे आकारण्यात येणार असून, १४ गाळेधारकांकडून फक्त बांधकामाचा नाममात्र खर्च घेऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. याशिवाय, मागील १५ वर्षांत महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभांमध्येही नेहरू मार्केटचा विषय वारंवार चर्चेला आला असून, गाळेधारक व ओटेधारकांचे ग्राउंड फ्लोअरवरच पुनर्वसन करण्यासंदर्भातील ठराव मंजूर झाल्याची बाबही संघटनेने निदर्शनास आणून दिली.

बैठकीत संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, नव्या व्यापारी संकुलाच्या उभारणीस किंवा इतर गाळ्यांच्या विक्रीला संघटनेचा कोणताही विरोध नाही. मात्र, मूळ गाळेधारक व ओटेधारकांना न्यायालयीन आदेशानुसार आणि महापालिकेच्या प्रतिज्ञापत्रानुसार ग्राउंड फ्लोअरवरच जागा देण्यात यावी, हीच त्यांची प्रमुख मागणी आहे. महापालिकेने याबाबत लवकरात लवकर लेखी निर्णय द्यावा. अन्यथा न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी महापालिकेविरोधात अवमान याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी बैठकीतील संपूर्ण चर्चेचे अधिकृत इतिवृत्त (प्रोसीडिंग) तयार करून संबंधित विषय महापालिकेच्या स्तरावर चर्चेस घेण्यात येईल आणि हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले. मात्र, संघटनेचे अध्यक्ष संजय झिंजे यांनी, ‘‘ग्राउंड फ्लोअरवरच पुनर्वसन व्हावे, या मागणीवर आम्ही ठाम आहोत. प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी,’’ असे स्पष्ट सांगितले. बैठकीला नेहरू मार्केट भाजी विक्रेता संघटनेचे आर. डी. करंदीकर, बी. बी. गौरी, अशोक लांडे, राजेंद्र चौधरी, रामभाऊ केळकर, रत्नाकर कोफ्लडके, बालाजी भुमय्या, पवन खेतमाळीस, रुपेश तरोटे, विजय चौधरी यांच्यासह अनेक गाळेधारक व ओटेधारक उपस्थित होते.

**‘हक्काची जागा मिळाली नाही तर न्यायालयीन लढा अपरिहार्य’**

‘‘महापालिकेने नेहरू मार्केट पाडताना उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून १४ गाळेधारक व ७० ओटेधारकांचे पुनर्वसन करण्याची स्पष्ट हमी दिली होती. आता त्याच जागेवर व्यापारी संकुल उभारताना मूळ धारकांना प्राधान्याने ग्राउंड फ्लोअरवर जागा देणे बंधनकारक आहे. नव्या इमारतीच्या बांधकामाला किंवा इतर गाळ्यांच्या विक्रीला आमचा विरोध नाही. मात्र, आमच्या हक्काची जागा ग्राउंड फ्लोअरवरच मिळाली पाहिजे. महापालिकेने प्रतिज्ञापत्रानुसार गाळे न दिल्यास न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यास आम्ही मागेपुढे पाहणार नाही. –संजय झिंजे (अध्यक्ष, नेहरू मार्केट भाजी विक्रेता संघटना)

## प्रोफेसर कॉलनी चौक येथील कचरा संकलन केंद्र तातडीने हलविण्याची नगरसेवकांची मागणी

घंटागाड्यांद्वारे एकत्रित आणला जातो. त्यानंतर येथून कॉम्पॅक्टरच्या माध्यमातून तो बुरुडगाव कचरा डेपो येथे पाठविला जातो. मात्र या केंद्रामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः पावसाळ्यात कचऱ्यातील घाण रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या परिसरात दत्त देवस्थान, छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा तसेच रात्री भरणारी चौपाटी असल्याने दररोज मोठ्या संख्येने नागरिक या भागात ये–जा करतात. त्यामुळे या प्रमुख ठिकाणी असलेले कचरा संकलन केंद्र तातडीने अन्यत्र हलविण्याची मागणी प्रभाग क्रमांक ७ मधील नगरसेवक मनोज दुल्लम, सतीश शिंदे, करण कराळे आणि पुष्कर कुलकर्णी यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

यानंतर महापौर ज्योतीताई गाडे यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि प्रशासनाला तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी सांगितले की, या कचरा संकलन केंद्रासाठी पर्यायी जागेची तातडीने पाहणी करून केंद्र स्थलांतरित करण्याबाबत कार्यवाही करावी. प्रोफेसर कॉलनी चौक हा शहरातील प्रमुख आणि अत्यंत वर्दळीचा भाग असल्याने येथे स्वच्छता राखणे अत्यंत आवश्यक आहे. परिसरात नियमित साफसफाईसह वेळोवेळी औषध फवारणी करण्यात यावी, जेणेकरून दुर्गंधी पसरू नये आणि नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले.

यावेळी नगरसेवक सतीश शिंदे म्हणाले की, प्रोफेसर कॉलनी चौक येथील कचरा संकलन केंद्र हटविण्याचा प्रश्न तातडीने मार्गी न लावल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल. या केंद्रामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असून वेळोवेळी प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही. महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या असून प्रशासनाने त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

## शिर्डीत स्मार्ट मीटर हटवावेत यासाठी आमरण उपोषण

आकारली जातील तसेच स्मार्ट मीटर बसवितांना ग्राहकांना त्याचे फायदे आम्ही समजून सांगू आणि ग्राहकांचा संभ्रम दूर करू असे आश्वासन दिले मात्र प्रत्येक ग्राहकाच्या घरी बसविलेले मीटर ही महावितरणची संपत्ती असून स्मार्ट मीटर ही योजना शासनाकडून ग्राहकांना मोफत असल्याने कोणतेही शुल्क न आकारता आम्ही बसवून देत आहोत आणि अचूक बिलिंग होण्यासाठी तसेच ग्राहकांना मोबाईल ॲप द्वारे दर तासाचा वीजवापर कळत असल्याने वीज वापरावर नियंत्रण ठेवता येते असे अनेक फायदे होणार असल्याचे सांगत... तुमच्या मागण्या आम्ही वरिष्ठांपर्यंत पोहोचवू असे आश्वासन दिले व उपोषणकर्ते अविनाश शिंदे यांनी महावितरणला सहकार्य करत आपले उपोषण स्थगित करावे अशी विनंती केली असता लेखी आश्वासनानंतर अविनाश शिंदे यांनी आपले उपोषण स्थगित केले